**सें.हिं.मि.एज्यु.सोसायटीचे**

**भोसला मिलिटरी कॉलेज,**

रामभूमी , नासिक – ५

दिनांक १३/१०/२०२०

**(मुस्लिम , ख्रिश्चन , शीख , बौध्द व पारशी) विद्यार्थ्यांकरीता सूचना**

**अल्पसंख्याक पोस्ट मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती**

- सर्व अल्पसंख्याक (मुस्लिम , ख्रिश्चन , शीख , बौध्द व पारशी) या विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, सन २०२०-२१ करीता शिष्यवृत्तीसाठी अर्ज दिनांक ३०-१०-२०२० पर्यत https://scholarships.gov.in/ संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने जमा करावीत.
- अपुर्ण भरलेले किंवा चुकीचे भरलेले अर्ज स्विकारले जाणार नाही .
- विद्यार्थ्यांनी दिलेल्या अर्जात सर्व आवश्यक नोंदी व कागदपत्रे यांची पुर्तता केलेली असावी .
- विहीत दिनांका नंतरच्या सर्व अर्जांची जबाबदारी विद्यार्थ्यांची असेल याची नोंद घ्यावी .

प्राचार्य
भोसला मिलिटरी कॉलेज
रामभूमी , नासिक – ५

सोबत – जाहिरात जोडली आहे.

# केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना

| अ.क्र. | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| 1 | योजनेचे नांव | केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना |
| 2 | योजने बद्दलचा शासन निर्णय | उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शा. नि. क्र. संकीर्ण 2007/(542/07)/तांशि-1 दि. 21.1.2008 |
| 3 | योजनेचा स्वरूप | केंद्रशासनाकडून राज्यातील मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, पारशी, जैन व बौध्द या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना सन 2007-08 पासून राबविण्यात येते.<br>सदर शिष्यवृत्ती 11 वी ते पी. एचडी., व्यावसायिक (डी.एड, बी.एड, एम.एड, आय.टी.आय) सर्व अभ्यासक्रमांना देण्यात येते. (तंत्र शिक्षण विभागातील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यादीतील अभ्यासक्रम सोडून)<br>केंद्रशासनाकडून या शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र राज्यासाठी 47575 संच निर्धारीत करण्यात आलेले आहेत. त्यापैकी मुलींसाठी 30 टक्के संच राखीव आहेत. |

| अ.क्र. | प्रवर्ग | संच | अ.क्र. | प्रवर्ग | संच |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मुस्लीम | 27734 | 4 | पारशी | 96 |
| 2 | ख्रिश्चन | 2309 | 5 | जैन | 2994 |
| 3 | शीख | 477 | 6 | बौध्द | 13965 |

| अ.क्र. | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| 4 | योजनेचा उद्देश | अल्पसंख्यांक समाजाच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे. |
| 5 | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, पारशी, जैन व बौध्द या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी सदर योजना लागू आहे. |
| 6 | योजनेच्या प्रमुख अटी | १. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.<br>२. मागील वार्षिक परिक्षेत किमान 50 टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.<br>३. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.<br>४. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रू. 2.00 लाख पेक्षा जास्त नसावे.<br>५. एका कुटूंबातील फक्त 2 अपत्यांनांच सदर योजनेचा लाभ घेता येईल.<br>६. शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणासाठी विद्यार्थ्याने पुढील वर्गात प्रवेश घेतलेला असावा, तसेच मागील वार्षिक परिक्षेत किमान 50 टक्के गुण घेऊन उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.<br>७. विद्यार्थ्याने कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये स्वत:चे खाते उघडणे आवश्यक आहे. |
| 7 | आवश्यक कागदपत्रे | १. मागिल वर्षाची गुणपत्रिकेची प्रत.<br>२. सक्षम प्राधिकाऱ्यांने दिलेले पालकाचे वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र आवश्यक.<br>३. सक्षम प्राधिकाऱ्यांने दिलेले रहिवास प्रमाणपत्र आवश्यक.<br>४. महाविद्यालयास चालु वर्षाची फी भरल्याची पावती.<br>५. महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र.<br>६. अल्पसंख्याक असल्याबाबतचे स्वयंघोषीत प्रमाणपत्र. |
| 8 | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप | केंद्रशासनाच्या नियमानुसार अभ्यासक्रमाचे शुल्क / शिक्षण शुल्क (course / Tution fee), परिरक्षण भत्ता (Maintenance Allowance) हे लाभ देण्यात येतात.<br>सदर रक्कम ही अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचेमार्फत विद्यार्थ्यांचे थेट बँक खातेवर (DBT) जमा करण्यात येते. |
| 9 | अर्ज करण्याची पध्दत | नवीन मंजूरीसाठी तसेच नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. |
| 10 | ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | www.scholarships.gov.in |